स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम्.ए., पीएच्.डी.
**संचालक** (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२५–२६/२८९ दि. १५/०९/२०२५

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
फक्त पुणे शहर,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे साहित्य संमेलन व त्यानिमित्त ग्रंथदिंडी बाबत...

संदर्भ : १.अण्णाभाऊ साठे संशोधन प्रशिक्षण संस्था (आर्टी), मुंबई यांचे जा.क्र. आर्टी/आस्था/सभागृह/२०२५–२६/०१६३, दि. १२/०९/२०२५ रोजीचे पत्र
२. मा.कुलगुरू यांचे कार्यालयामार्फत संदर्भ क्र.१ पत्र आवक क्र.व्हीसी/४६४८ दि.१३ सप्टेंबर २०२५ रोजी अग्रेषित

महोदय,

अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी), मुंबई ही महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्थापन केलेली संस्था असून अनुसुचित जातीतील मांतग व तत्सम जातींच्या शैक्षणिक व सामाजिक विकासाठी काम करणारी संस्था आहे. अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी), मुंबई यांच्यावतीने लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे साहित्य संमेलन हे मंगळवार, दि. २३ सप्टेंबर २०२५ या दिवशी बालगंधर्व रंगमंदिर पुणे येथे आयोजित करण्यात आले आहे.

उपक्रमाचे स्वरूप पुढीलप्रमाणे असणार आहे. स. ०८ ते ८.३० नाव नोंदणी आणि अल्पोपहार, स. ८.३० ते ९.३० बालगंधर्व रंगमंदिर – पुणे महानगर पालिका मेट्रो स्टेशन – बालगंधर्व रंगमंदिर ग्रंथदिंडींचे आयोजन, स. ९.३० ते सायं. ४ अण्णाभाऊ साठे साहित्य संमेलन आणि परिसंवाद दु. १.३० ते २.३० भोजन असे असणार आहे. या साहित्य संमेलनाच्या उद्‌घाटन व समारोप प्रसंगी मा. मंत्री उच्च व तंत्र शिक्षण हे उपस्थित राहणार आहेत. तरी या उपक्रमाकरिता आपल्या महाविद्यालयातील २० स्वयंसेवक व ०१ रासेयो कार्यक्रम अधिकारी यांना पारंपारीक वेशभुषेमध्ये ग्रंथदिंडीच्या नियोजनासह दि. २३ सप्टेंबर २०२५ रोजी, सकाळी ८.०० वाजता बालगंधर्व रंगमंदिर याठिकाणी उपस्थित राहण्याविषयी कळवावे आणि या उपक्रमात सहभागी होऊन सहकार्य करावे. सदर सहभागी स्वयंसेवक आणि कार्यक्रम अधिकारी यांची नोंदणी दि. १९ सप्टेंबर २०२५ रोजी सायं ०४ वाजेपर्यंत **https://forms.gle/GDsA8V5YmNZTn5NB6** या गुगल फॉर्मद्वारे करणे अनिवार्य आहे. कळावे, ही विनंती.

अधिक माहितीकरिता संपर्क:
डॉ. धनंजय भिसे – ९८२२५०८४९२/७९७२९८४५३६

संचालक (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत : अण्णाभाऊ साठे संशोधन प्रशिक्षण संस्था (आर्टी), मुंबई यांचे पत्र

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-७.
आवक/जावक क्र.: 503
दिनांक 13 SEP 2025
राष्ट्रीय सेवा योजना
शाखा



# अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी), मुंबई

**(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)**

**बी-२०१/२०२ अर्जुन सेंटर, स्टेशन रोड, गोवंडी (पु) मुंबई- ४०० ०८८**

समता न्याय एकात्मता

रजि नं.४३७६०३ Email Id- esta.arti@gmail.com website https://arti.org.in फोन नं. ०२२ - ४४५१५८५४/२५५००११४/२५५००११५

जा.क्र.आर्टी/आस्था/सभागृह/२०२५-२६/ ०१६२ दिनांक:- १२/०९/२०२५

मा. कुलगुरु यांचे कार्यालय
सावत्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
आवक
दिनांक 12 SEP 2025
आवक क्रमांक व्हीसी 9698
जावक दिनांक 13 SEP 2025

प्रति,
मा. कुलगुरु,
सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे

**विषयः- अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी) व पुणे महानगरपालिका यांच्या वतीने आयोजित केलेल्या साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णा भाऊ साठे साहित्यसंमेलना निमित्त ग्रंथदिंडीस व कार्यक्रमास एन.एस.एस व विद्यार्थी कल्याण मंडळाचे विद्यार्थी उपस्थित राहणेबाबत...**

महोदय,

अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी), मुंबई ही महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्थापन केलेली संस्था असून अनुसुचित जातीतील मातंग व तत्सम जातींच्या शैक्षणिक व सामाजिक विकासासाठी काम करणारी संस्था आहे. तरी लोकशाहीर डॉ. अण्णा भाऊ साठे साहित्य संमेलन हे मंगळवार दि. २३ सप्टेंबर २०२५ या दिवशी हे संमेलन बालगंधर्व रंगमंदिर पुणे येथे आयोजित करण्यात येत असून, पुणे महानगरपालिका येथून सकाळी ९ पासून ते बालगंधर्व रंगमंदिर या ठिकाणा पर्यंत ग्रंथदिंडीचे आयोजन करण्यात आलेले आहे.

सदर साहित्य संमेलनाच्या उद्घाटन व समारोप प्रसंगी मा. मंत्री महोदय उपस्थित असणार आहेत , तरी सदर ग्रंथदिंडी व साहित्य संमलनाच्या कार्यक्रमास **एन. एस. एस व विद्यार्थी कल्याण मंडळाचे विद्यार्थी उपस्थित राहून कार्यक्रमात सक्रीय सहभाग घेऊन संमेलनाच्या नियोजनात सहकार्य करावे**, ही विनंती.

मा.व्यवस्थापकीय संचालक यांचे मान्यतेने

निबंधक
अण्णा भाऊ साठे संशोधन
प्रशिक्षण संस्था (आर्टी), मुंबई

Dir-NSS
Dir-BSD
12/9